नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २०/०२/२०२५ (गुरूवार) सकाळ**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द कारवाई

**पोलीस स्टेशन देवलापार** :—दिनांक १९/०२/२५ रोजी देवलापार पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा तुमडीटोला शिवार पवनी ते हिवराबाजार रोड येथे पेट्रोलींग केली असता संशयीत निळया रंगाचे १२ चक्का टिप्पर क्र एमएच ३४ बीजी ५५६७ मिळुन आले त्यास थांबवुन पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. चालक आरोपी नामे १) राकेश देविदास भोयर, वय ३१ वर्षे, रा. वार्ड क्र १, समाज भवन जवळ, जुनी कामठी, पोस्ट गोडेगाव ता. पारशिवनी जि. नागपुर. याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडील परवान्यामध्ये ४.९७ ब्रास ची रॉयल्टी होती. ४ ब्रास रेती विना रॉयल्टी वहानामध्ये मिळुन आली .तसेच रेतीची वाहतुक टिप्पर चा मालक रज्जत रमेश यादव वय ४० वर्षे, रा. कन्हान ता. पारशिवनी जि. नागपूर यांच्या सांगण्यावरून करीत असल्याबाबत सांगितले. पोलीसांनी आरोपीच्या ताब्यातुन पंचासमक्ष १२ चक्का टिप्पर क्र. एम. एच ३४ बीजी ५५६७ रेती सह किंमती ५०,२०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.

चालक आरोपी क्र १) राकेश देविदास भोयर, वय ३१ वर्षे, रा. वार्ड क्र १, समाज भवन जवळ, जुनी कामठी, पोस्ट गोडेगाव ता. पारशिवनी जि. नागपुर आणि आरोपी क्र २) मालक नामे रज्जत रमेश यादव वय ४० वर्षे, रा. कन्हान ता. पारशिवनी जि. नागपूर यांच्या विरूध्द कलम ३०३(२), ४९ बीएनएस सहकलम ४८(७), ४८(८), महा.जमीन महसुल संहिता सहकलम ४,२१, खाण आणि खनिज अधि. सहकलम ३ सार्व. संपत्ती नुकसान अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. दोन्ही आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर